## नियमित फौजदारी खटला क्र.२१०/२०२२ मधील निशाणी २२ वरील आदेश

(CNR NO.MHAK070010082022)

( महाराष्ट्र सरकार ..वि.. विठ्ठल पंजाबराव मेहेंगे व इतर)

(दिनांक १९.०९.२०२२)

१. अर्जदार **गजानंद रिध्दकरण शर्मा** यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५१ प्रमाणे नियमित फौजदारी खटला क्र.२१०/२०२२, बाळापूर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३३८/२०२१ (भारतीय दंड विधान कलम ४६१ व ३८० सह कलम ३४) मधील जप्त **धान्य सोयाबीन एकुण ६० बॅग, वजन ३५ क्विंटल** (संक्षिप्तेकरिता "जप्त मुद्देमाल") मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या कथनानुसार ते मुळ रा. एल. टी. सी. कर्मशीअल कंपनी प्रा. लि., १५६ नवलगड हाऊस, संसारचंद्र रोड, जयपूर येथील रहिवासी आहेत. अर्जदाराचे पुढे कथन असे की, ते एल.टी.सी. कर्मशीअल कंपनी प्रा.लि. मध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत असून सदर कंपनीचे गोडाऊन मौजे व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला येथील अंबूजा फॅक्ट्रीसमोर आहे. सदर गोडाऊनमध्ये अर्जदार कंपनी हे शेतकरी व व्यापारी यांचे धान्य भाडेतत्तवावर ठेवतात. सदर गोडाऊनमध्ये रुची सोया इंडस्ट्रीस लि. यांचे १०० कट्टे सोयाबीन व ए.डी.एम. ॲग्रो इंडस्ट्रीस, लातुर ॲन्ड व्हीजाग प्रा. लि. यांचे १०० कट्टे भाडेतत्वावर ठेवलेले होते. दिनांक ३१.०५.२०२१ रोजी कंपनीचे सुपरवायझर श्री. भगवान यांनी अर्जदार यांना दुपारी २.०० वाजता फोन करुन सांगितल की, वेअर हाऊसचे मागील बाजुस असलेल्या भिंतीला अंदाजे २ X २ फुटाचे छिद्र पडलेले आहे व सोयाबीन कट्टे चोरी गेले आहे. अर्जदाराने वेअर हाऊसमध्ये जावून पाहणी केली असता तेथून एकुण ६० सोयाबीनचे कट्टे वजन अंदाजे ३५ क्विंटल कोणतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याचे कळले. त्यामुळे अर्जदाराने दिनांक ३१.०५.२०२१ रोजी सदर घटनेचा रिपोर्ट पोलीस ठाण्यात दिला. ठाणेदार पोलीस स्टेशन, बाळापूर यांनी अपराध क्र. ३३८/२०२१ या गुन्ह्यामध्ये अर्जदार कंपनीचे चोरी गेलेले एकुण ६० सोयाबीन कट्टे जप्त केले. म्हणुन अर्जदार यांनी सदर मुद्देमालची मागणी केलेली आहे. सबब, अर्जदार यास प्रस्तुत मुद्देमालची तातडीने आवश्यकता आहे. त्यामुळे प्रस्तुतचा मुद्देमाल अर्जदार

यांचे स्वतःचे मालकीचे असल्याने ते अर्जदार यास परत मिळावा याकरिता अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. या प्रकरणात सरकारी वकीलांनी सदर अर्जाखाली म्हणणे देवून सदर अर्जास प्रखर विरोध केला आहे व म्हटले की, सदर जप्त मुद्देमाल पुराव्याकामी महत्वाचा असून त्यात बदल होण्याची व त्याची विल्हेवाट लावण्याची शक्यता आहे. म्हणून अर्ज नामंजुर करावा, अशी विनंती केली आहे.

४. तपासिक अंमलदार यांनी निशाण क्र.२७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन म्हटले की, अर्जदार हे न्यायालयाने दिलेल्या अटी व शर्तीचे पालन केल्यास त्यांना सदर जप्त मुद्देमाल सुपुर्दनाम्यावर देण्यास त्यांची काही हरकत नाही.

५. सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ या खटल्यातील आरोपी विठ्ठल पंजाबराव मेहेंगे, देवानंद पंजाबराव मेहेंगे व अविनाश बाळकृष्ण मेहेंगे यांना त्यांच्या म्हणण्याकरीता नोटीसा काढण्यात आल्या. त्यांनी त्यांचे म्हणणे पुरसीस (निशाणी २९) वर दाखल केले व सदर मुद्देमाल अर्जदारास सुपुर्दनाम्यावर देण्यास त्यांची काहीही हरकत नाही असे कळविले.

६. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. उभय बाजूचे म्हणणे ऐकले.

७. अर्जदार गजानंद रिध्दकरण शर्मा यांनी सदर अर्जासोबत सदर मुद्देमालच्या मालकीच्या पुष्ठ्यर्थ त्यांचे स्वतःचे अधिकार पत्र व अर्जदाराच्या आधार कार्डाची व्हेरीफाईड प्रत व एफ.आय.आर. ची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे.

८. या मुद्देमालचा ताबा मिळण्यासाठी अन्य कोणीही अर्ज केलेला नाही अगर या मुद्देमाल वर कुणीही मालकी हक्क अगर अंतरिम ताबा मिळण्याचा हक्क सांगीतलेला नाही. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये अर्जदार कंपनी ही सदर मुद्देमालची मालक असल्याचे दिसुन येते. सदर मुद्देमाल पोलिस स्टेशनला प्रकरणाचा निकाल होईपर्यंत राहिल्यास खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मुद्देमाल हा पोलीसांनी या गुन्ह्यात जप्त केला असल्याची बाब आता वादातीत नाही. तसेच अर्जदाराने सादर केलेल्या वर नमुद कागदपत्रांवरुन सदर मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र असल्याचे

दिसते. अशा परिस्थितीमध्ये जप्त मुद्देमाल योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदार यांच्या ताब्यात देणे योग्य होईल. म्हणुन खालील आदेश पारित करण्यात येतोः

**आ दे श**

**१.** पोलीस निरिक्षक, बाळापूर पोलीस स्टेशन यांना आदेश देण्यात येतो की, नियमित फौजदारी खटला क्र.२१०/२०२२, बाळापूर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३३८/२०२१ मधील जप्त (**धान्य सोयाबीन एकुण ६० बॅग, वजन ३५ क्विंटल**) हा अर्जदारास रक्कम रुपये ३,५०,०००/– (रुपये तीन लाख पन्नास हजार फक्त) चे हमीपत्र दिल्यानंतर परत देण्यात यावे.

**२.** जप्त मुद्देमालाचा ताबा मिळण्यास अर्जदार पात्र नव्हाता व अन्य इसम पात्र होता असे सुनावणी अंती आढळून आल्यास अर्जदाराने वर नमुद हमीपत्राची रक्कम न्यायालयात जमा करावी.

**३.** तसेच तपासी अधिकारी यांनी सदर मुद्देमाल अर्जदारास परत करण्यापूर्वी फोटो काढून त्याबाबत पंचनामा करावा. असा पंचनामा व फोटो त्यांचे निगेटीव्हसह तथा योग्य त्या प्रमाणपत्रासह न्यायालयात या आदेशापासून आदेशापासून सात दिवसांच्या आत दाखल करावेत. या सर्व प्रक्रियेचा खर्च प्रस्तुत अर्जदाराने करावा.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by NITIN CHANDRAKANT PAWAR
Date: 2022.09.19 17:42:51 +0530

**दिनांक – १९/०९/२०२२** (**नितीन चं. पवार**)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, बाळापूर.

| Affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
|---|---|---|
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of Stenographer | :- | Shaikh Rafique |
| Date of Decision | :- | 19/09/2022 |
| Judgment/order signed by P.O. on | :- | 19/09/2022 |
| Judgment/order uploaded on | :- | 19/09/2022 |